RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




गुरूवार, १७ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : १११ | दैनिक | किंमत : ₹५/-
Thursday, 17 April 2025 | Year : 5 | Issue : 111 | Daily | Rate: Rs. 5/-

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्राला सवाल

## हिंदू धर्माच्या संस्थेवर मुस्लिमांना संधी मिळणार का?




**नवी दिल्ली :** वक्फ (सुधारणा) कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. वक्फ कायद्यात केलेल्या अनेक तरतुदींबाबत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला प्रश्न विचारले. वक्फ कायद्यात सुधारणा करताना वक्फ बोर्डावर बिगरमुस्लीम सदस्यांची नेमणूक करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. आता हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लीम व्यक्तीची नेमणूक करणार का?, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला विचारला. सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायाधीश संजय कुमार आणि न्यायाधीश केव्ही विश्वनाश यांच्या खंडपीठासमोर याचिकेची सुनावणी सुरू आहे. वक्फ कायद्याविरोधात 70 हून अधिक याचिका दाखल झाल्या असून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. तर केंद्र सरकारच्या वतीने महाअधिवक्ता तुषार मेहता युक्तिवाद करत होते. वक्फ बोर्डावर बिगर मुस्लीम सदस्याची नेमणूक करण्याबाबत कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यानंतर सर्वोच्च न्यायालयाने तुषार मेहता यांना थेट प्रश्न विचारला. यापुढे हिंदू धर्माच्या संस्थांवर मुस्लीम व्यक्तीला घेतले जाणार का? सरकारची यावर काय भूमिका आहे? असा प्रश्न खंडपीठाने विचारला. वक्फ मालमत्तेचे वाद सोडविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निर्णय घेण्याचे अधिकार नव्या कायद्याद्वारे देण्यात आले आहेत. यावरही सरन्यायाधिशांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वक्फ मालमत्तेचे वाद सोडविण्याचा निर्णय न्यायालयात का होऊ शकत नाही? यावर तुषार मेहता यांनी सांगितले की, वक्फ संपत्तीची नोंदणी करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळाले आहेत. याआधीही वक्फची नोंदणी करण्याची तरतूद होतीच. अंतरिम स्थगितीवर अद्याप निर्णय नाही संसदेने मंजूर केलेला वक्फ कायदा संविधानाच्या अनुच्छेद 14, 15, 21, 25 आणि 26 च्या अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्य आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारा आहे. मुस्लीम पक्षकारांनी या कायद्याविरोधात अंतरिम आदेश देण्याची मागणी केली. मात्र त्याआधी सुनावणी पार पाडली जावी, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. उद्या पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. याशिवाय वक्फ कायद्यावरून देशात विविध ठिकाणी चाललेल्या हिंसाचाराबाबतही सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली.

## भारताच्या सरन्यायाधीशपदी पुन्हा एकदा महाराष्ट्राचे सुपुत्र



**नवी दिल्ली :** भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी बुधवारी केंद्रीय कायदा मंत्रालयाकडे न्यायमूर्ती बी. आर गवई यांची पुढील सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस केली. 10 नोव्हेंबर रोजी निवृत्त झालेले माजी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या जागी न्यायमूर्ती खन्ना यांची 11 नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. आता बी. आर. गवई यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

खन्ना हे सहा महिन्यांच्या अल्प कालावधीनंतर 13 मे 2025 रोजी निवृत्त होणार आहेत. परंपरेनुसार, विद्यमान सरन्यायाधीश त्यांच्या उत्तराधिकारी म्हणून सर्वात वरिष्ठ न्यायाधीशाची शिफारस करतात. यापूर्वी, कायदा मंत्रालयाने न्यायमूर्ती खन्ना यांना त्यांच्या उत्तराधिकारीची निवड करण्याची औपचारिक विनंती केली होती. यामुळे नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली. जर न्यायमूर्ती गवई यांची नियुक्ती झाली तर ते भारताचे 52 वे सरन्यायाधीश होतील. ते 14 मे रोजी सर्वोच्च न्यायिक अध्यक्षपदाची शपथ घेण्याची शक्यता आहेत. तर, न्यायमूर्ती गवई नोव्हेंबर 2025 मध्ये निवृत्त होणार असल्याने ते फक्त सहा महिनेच भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील. न्यायमूर्ती गवई यांची 24 मे 2019 रोजी भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. बी. आर. गवई यांचा जन्म 24 नोव्हेंबर 1960 रोजी झाला असून महाराष्ट्रातील अमरावती येथील ते रहिवासी आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि बिहार व केरळचे माजी राज्यपाल दिवंगत आर. एस. गवई यांचे ते पुत्र आहेत. न्यायमूर्ती गवई यांनी 14 नोव्हेंबर 2003 रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून आपल्या न्यायालयीन कारकिर्दीला सुरुवात केली आणि 12 नोव्हेंबर 2005 रोजी ते कायमस्वरूपी न्यायाधीश बनले. त्यांनी 15 वर्षांहून अधिक काळ मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि पणजी येथील खंडपीठांचे अध्यक्षपद भूषवले. विशेष म्हणजे, भारताचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्त होणारे दुसरे अनुसूचित जातीचे न्यायाधीश असतील. न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन हे अनुसूचित जातीतील पहिले न्यायाधीश होते. 2016 च्या नोटाबंदीचे गवई यांनी समर्थन केले होते. नोटा अवैध घोषित करण्याच्या केंद्र सरकारच्या अधिकाराची पुष्टी करत ही योजना प्रमाणिकतेची कसोटी पूर्ण करते असे म्हटले होते. एका ऐतिहासिक निकालात, त्यांनी असे म्हटले की योग्य प्रक्रियेशिवाय आरोपीची मालमत्ता पाडणे हे असंवैधानिक आहे, कार्यकारी अधिकारी न्यायाधीश म्हणून काम करू शकत नाहीत आणि कायदेशीर प्रक्रियेशिवाय पाडकाम करू शकत नाहीत यावर भर दिला होता. राजकीय निधीतील पारदर्शकतेबद्दलच्या चिंता दूर करण्यासाठी निवडणूक बाँड योजनेच्या घटनात्मक वैधतेची तपासणी करणाऱ्या खंडपीठाचेही ते एक भाग होते.

## संविधान चौकात भरगच्च कार्यक्रमांनी डॉ. आबेडकरांना जयंतीदिनी अभिवादन




**नागपूर :** बुद्ध विहार मैत्री संघ, वंदना संघ दिक्षा भूमी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव संविधान चौक, नागपूर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बोधिसत्व - परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विद्यार्थी दिन - विजय दिन निमित्ताने संविधान चौक येथे विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वसंत धम्म दिप यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करून सामुहिक बुद्ध वंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर सर्व संयोजक मंडळी दिक्षा भूमी येथील तथागत सम्यक सम्बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लगेच संविधान चौक येथे पोहोचून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन पर गीत गायन सुरु करण्यात आले. सम्यक म्युझिकल ग्रुपच्या (नरेश धोपटे) सहकाऱ्यांनी सुमधुर आवाजात गीत गायन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षा होत्या? याविषयी मार्गदर्शन करतांना प्रशांत हांडे, नगर भूमापन अधिकारी, नागपूर यांनी समाज कल्याणासाठी स्वतः ला वाहून घेण्याचा संदेश दिला. महिला सशक्तीकरणा बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत काय होते? याविषयी माधुरी दुपटे यांनी महापुरुषांच्या वैचारिक साहित्याचे वाचन करावे, असा संदेश दिला. त्यानंतर भानू कुमार आणि त्यांचा संच यांनी अभिवादन पर गीत गायन केले. विलास गजभिये कार्यकारी संपादक बहुजन सौरभ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता आणि त्यानंतर चे वर्तमान पत्र याविषयी मार्गदर्शन. ज्यावेळी समाज बोलत नव्हता तेव्हा मुकनायक नावाने वृत्तपत्र सुरू केले. त्यानंतर बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या वृत्तपत्राचे प्रकाशन पैशा अभावी कसे बंद पडले, ते सांगून नागपूर शहरातून प्रकाशीत होणारे समाजात परिवर्तन घडवून आणणारे बहुजन सौरभ वृत्तपत्र ते चालविण्यासाठी येणाऱ्या अडचणी यावर मार्गदर्शन केले. लगेच वंदना संघ दिक्षा भूमी यांच्या धम्म घोष या मासीकाचे विमोचन करण्यात आले. निर्मलाताई जिवने यांनी मी रमाई बोलते, एक पात्री नाटक सादर केले. रविंद्र डोंगरे यांनी शिकवा... चेतवा.... संघटीत करा... यावर मार्गदर्शन केले. त्यानंतर विनोदकुमार धाबर्डे आणि संच यांनी परिवर्तनात्मक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गीते सादर केले. याप्रसंगी यशस्वी डोंगरे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन आणि 22 प्रतिज्ञा दिल्या. मैत्री विकास महिला मंडळ विठ्ठलवाडी यांच्या वतीने मंगल कामना गीत आणि धम्म पालन गाथेने या शेवट झाला. या कार्यक्रमाचे संचालन धर्मेश प्रसन्नजीत यांनी केले, तर आभार विश्वनाथ लोखंडे यांनी केले. हा कार्यक्रम मागील 26 वर्षांपासून अविरत सुरू आहे. कार्यक्रम आयोजित करण्यात सुर्यभान वैद्य, रेवनदास लोखंडे, कमलाकर कानफाडे, जी.के. पाटील, चहांदे, रविंद्र डोंगरे, राहूल सुर्यवंशी, रेखचंद मेश्राम या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी पार पडला.

## प्रथम पुण्यस्मरण



**स्मृतिशेष कांचन दयावंत गजघाटे**

यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

मृत्यू : 17/4/2024

: अभिवादक :

मुलगा शिलवंत गजघाटे, प्रेषित गजघाटे, पोर्णिमा राजरतन मोटघरे वहिनी, भूमिका देसाई मोठी बहीण, आम्रपाली प्रकाश लोखंडे मोठी बहीण, वैशाली वंजारी बहीण, संगीता उके बहीण, सुजाता मोटघरे बहीण, पायल प्रकाश लोखंडे बहीण लेक, निधी प्रकाश लोखंडे बहीण लेक, शर्मिला विनोद मोटघरे वहिनी आणि श्रुती मोटघरे भाची.

समस्त गजघाटे परिवार




## ममता बॅनर्जीचा योगी आदित्यनाथांवर पलटवार



**कोलकत्ता :** पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे गेल्या काही दिवसांपासून हिंसाचार सुरू आहे. या हिंसाचाराच्या विरोधात भाजपाकडून टीकास्त्र सोडले जात आहे. त्यातच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर टीका करत हिंसाचारासाठी त्यांना जबाबदार धरले होते. यावर आता ममता बॅनर्जी यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. काही दिवसांपूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीची आठवण करून देताना यात 30 लोकांचा बळी गेल्याचे बॅनर्जी यांनी म्हटले. मुस्लीम धर्मगुरूंच्या बैठकीत बोलत असताना ममता बॅनर्जी यांनी योगींना सर्वात मोठा भोगी असल्याचे म्हटले. तसेच त्यांच्या काळात उत्तर प्रदेशमध्ये झालेल्या बनावट चकमकींचा दाखला दिला. 'योगी मोठ्या मोठ्या बाता करतात. पण ते सर्वात मोठे भोगी आहेत. महाकुंभमेळ्यात अनेक लोकांचे जीव गेले. उत्तर प्रदेशमध्ये बनावट चकमकीत अनेकांना प्राण गमवावे लागले', असे विधान ममता बॅनर्जी यांनी केले. तसेच योगींच्या राज्यात लोकांना मोर्चेही काढता येत नाहीत. उत्तर प्रदेशच्या तुलनेत बंगालमध्ये खूप स्वातंत्र्य आहे, असेही त्या म्हणाल्या. पश्चिम बंगाल जळत आहे, असे विधान योगी आदित्यनाथ यांनी काल (दि. 13 एप्रिल) केले होते. हरदोई जिल्ह्यातील राजा नरपती सिंह यांच्या स्मृतीस्थळी आयोजित कार्यक्रमात बोलत असताना योगी आदित्यनाथ म्हणाले, 'पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री दंगेखोरांना शांतीदूत म्हणत आहेत. परंतु, या दंगेखोरांना प्रेमाची भाषा कळत नाही. यांना केवळ काठीचीच भाषा समजते. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली तिथल्या सरकारने दंगेखोरांना सूट दिली आहे. त्यामुळे संपूर्ण मुर्शिदाबाद एक आठवड्यापासून जळत आहे आणि सरकारने मौन बळगले आहे. या अराजकतेवर लगाम लावायला हवा.' भाजपाच्या आरोपांना उत्तर देत असताना मुर्शिदाबाद येथील दंगल पूर्वनियोजित असल्याचा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला. 'विरोधकांनी केलेल्या आरोपांनुसार जर तृणमूल काँग्रेस पक्ष हिंसाचारात सहभागी असता तर आमच्याच नेत्यांच्या घरावर हल्ले झाले नसते. आमच्या पक्षाने वक्फ कायद्याविरोधात संसदेत कडक भूमिका घेतली. वक्फ कायद्याच्या विरोधातील लढाईत टीएमसी पक्ष आघाडीवर आहे', असेही ममता बॅनर्जी म्हणाल्या. तसेच भाजपाच्या पाठिंब्याने काही वृत्तसमूह बनावट व्हिडीओ व्हायरल करत असून पश्चिम बंगालची बदनामी करत आहेत, असाही आरोप ममता बॅनर्जी यांनी केला. 'आम्ही खोट्या व्हिडीओंची खातरजमा केली आहे. आठ व्हिडीओपैकी काही व्हिडीओ कर्नाटक, काही उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थानमधील आहेत. हे सर्व बंगालला कलंकित करण्यासाठी केले जात असून याबद्दल त्यांना लाज वाटली पाहिजे.

## चीनकडून 85 हजार भारतीयांना व्हिसा?



**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर टॅरिफ अस्त्र उगारल्यानंतर चीनला मित्रत्वाची उपरती झाली आहे. चीनच्या परराष्ट्र विभागाने अलीकडेच भारताला म्हटले आहे की 'आता आपण एकत्र यायला हवे!' पाठोपाठ चीनने आणखी एक मोठं पाऊल उचललं आहे. चीनी दूतावासाने यावर्षी 85 हजारांहून अधिक भारतीयांना व्हिसा जारी केला आहे. 1 जानेवारी ते 9 एप्रिल या सव्वातीन महिन्यांच्या काळात 85,000 भारतीयांचा चीनला जाण्याचा व्हिसा मंजूर झाला आहे. चीनने भारतीयांना व्हिसा देण्याच्या बाबतीत सौम्यपणा अंगीकारला आहे. ड्रॅगनने दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्याच्या दृष्टीने छोटी-छोटी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दुसऱ्या बाजूला डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवरील आयात कर 145 टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर चीनने अमेरिकेवरून आयात होणाऱ्या वस्तूंवरील आयात शुल्क 125 टक्के केले आहे. पाठोपाठ, ट्रम्प यांनी चीनी आयातीवरील शुल्क 245 टक्के केले आहे.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप. बँक लि. नागपूर

मुख्य कार्यालय - लक्ष्मीनगर नागपूर.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा

**बँकेच्या शाखा :**
**लक्ष्मीनगर शाखा :** एम. ए. 1, लक्ष्मीनगर चौक, नागपूर
**इंदोरा शाखा :** मेश्राम भवन, आंबेडकर मार्ग, बुध्द नगर, नागपूर.
**त्रिमुर्तीनगर शाखा :** 15, गोवर्धन बिल्डींग, त्रिमुर्तीनगर चौक नागपूर.

मुदतठेवीवर व्याजाचे दर

| कालावधि | व्याजदर |
|---|---|
| 7 दिवस ते 30 दिवस | 4.50टक्के |
| 31 दिवस ते 90 दिवस | 5.00टक्के |
| 91 दिवस ते 180 दिवस | 6.50टक्के |
| 181 दिवस ते 12 महिने | 7.00टक्के |
| 12 महिन्या वरील | 8.00टक्के |
| बचत खाते | 4.00टक्के |

ज्येष्ठ नागरिक व संस्थांना 0.5टक्के जास्त व्याज दर
कर्जावरील व्याज दर

| कर्जाचा प्रकार | व्याजदर |
|---|---|
| सोनेतारण कर्ज | 10.00 टक्के |
| घर बांधणी कर्ज | 11.00 टक्के |
| मॉर्टगेज कर्ज | 12.00 टक्के |
| कॅश क्रेडीट हायपोथीकेश कर्ज | 14.00 टक्के |
| वाहन तारण कर्ज | 14.00 टक्के |
| हायपोथीकेशन टर्म लोन (व्यावसायिक) | 14.00 टक्के |
| पगारतारण कर्ज | 13.00 टक्के |
| व्यैक्तिक कर्ज | 15.00 टक्के |

-: आपले विनीत :-

आयु. पद्माकर मोगरे — मुख्य कार्यकारी अधिकारी
आयु. अरविंद गजभिये — उपाध्यक्ष
आयु. अनिल नगरारे — अध्यक्ष

मा. संचालक प्राचार्य जानराव गजभिये, डॉ. गुलाबराव भोयर, ॲड. अशोक गेडाम, आयु. अशोक कोल्हटकर, आयु. धीरेंद्र चहांदे, आयु. मुरलीधर मेश्राम, डॉ. जयंत जांभुळकर, ॲड. मिलिंद गाणार, आयु. विजय भोयर, आयु. नागेश बुरबुरे, डॉ. दशरथ जाधव, आयु. संदेश कोटांगळे, आयु. धिरज भंडारे, आयु. विलास गजभिये, प्रा. राहुल मुन, आयु. विलास गावंडे, सौ. संगीता पाटणकर, सौ. चेतना कुंभारे, श्री. अश्विन कापसे (तज्ञ संचालक) आणि समस्त, अधिकारी व कर्मबारी वृंद.

“ शिला शिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे. ”



## संपादकीय

# अतिरेकीपणाचा कळस

इंधनाच्या दरात करण्यात आलेली उत्पादन शुल्काची वाढ, गॅस सिलेंडरच्या दरात झालेली वाढ, पाइप गॅसच्या दरात झालेली वाढ, या सगळ्या दरवाढीच्या बातम्या एकापाठोपाठ एक आल्यानंतर लोकांवर आणखी एक बोजा सरकारने टाकला आहे. हा बोजा म्हणजे सहकारी सोसायटीमध्ये राहणाऱ्या सभासदांच्या मेंटेनन्सवर नव्याने आकारल्या जाणाऱ्या जीएसटीचा आहे. शहरी मध्यमवर्गीयांसाठी हा दणका मोठा आहे. शहरी मध्यमवर्गीय ज्या सोसायट्यांमध्ये राहतात त्या सोसायटीतील देखभाल खर्चासाठी ते दरमहा काही पैसे मेंटेनन्स म्हणून भरतात. या मेंटेनन्सवर आता तब्बल 18 टक्के जीएसटी लागू केला जाणार आहे. आता खरे म्हणजे ही लोकांनी कपाळावर हात मारून घ्यावी अशी गोष्ट आहे. या आधीच देशातील सर्व नागरिक ब्रँडेड आटा, पनीर, दही अशा वस्तूंपासून जवळपास सगळ्याच वस्तूंवर वेगवेगळ्या टप्प्यातील जीएसटी भरत असतो. वह्या, पेन्सिल, दप्तरे अशा शालेय शैक्षणिक साहित्यावर पण जीएसटी लागूच आहे. सर्वच प्रकारच्या सेवांवरसुद्धा जीएसटी लागू आहे, फक्त सोसायट्यांचा मेंटेनन्स हा एकच विषय राहिला होता, सरकारची नजर आता त्याच्यावरही पडली आहे. हे सरकार देशातील जनतेला सळो की पळो करून सोडत आहे असेच चित्र दुर्दैवाने दिसते आहे. जनतेला दिलासा देणारी कोणतीही बाब किंवा निर्णय सरकारकडून घेतला जात नाही, किंबहुना जनतेला आता सरकारकडून कोणतीच आशा उरलेली नाही. देशाच्या भीषण आर्थिक व्यवस्थेचा फटका या आधीच जनसामान्यांना बसलेला आहे. बेरोजगारीचा दर गेल्या पन्नास वर्षातील उच्च अंकी पातळीवर आहे, नागरिकांचे उत्पन्न घटते आहे, कुठल्याच क्षेत्रात अपेक्षित पगारवाढ होताना दिसत नाही. यामुळे अत्यंत घायकुतीला आलेला गरीब आणि मध्यमवर्ग आपले दैनंदिन जीवन कसेबसे रेटत असताना केंद्र सरकारने अलीकडे हे धक्क्यामागून धक्के दिले आहेत. सरकार जनसामान्यांचा कुठल्याच दृष्टीने का विचार करत नसावे हे कोडे अजिबात उलगडत नाही. प्रसारमाध्यमांवर याची जरासुद्धा चर्चा होताना दिसत नाही. वास्तविक सरकारने स्वतःचे नुकसान करून न घेता आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे जे दर घसरले आहेत त्याचा लाभ जनतेला करून देणे सहज शक्य असताना सरकारने मात्र इंधनावरील उत्पादन शुल्कात वाढ करून जो लाभ नागरिकांना मिळणे अपेक्षित होता त्यात सरकारने स्वतःच हात धुऊन घेतल्याचे पाहायला मिळाले आहे. हे कथानक आजवर आपण इतक्या वेळा ऐकले आहे की देशातील इंधनाचे भाव कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय दरावर ठरतात, मग हे जर असे असेल तर कच्च्या तेलाचे भाव उतरल्यानंतर त्याचा जनतेला लाभ का होत नाही, इंधनावर उत्पादन शुल्क लावून जनतेला होणारा हा लाभ सरकार परस्पर का काढून घेते, हा प्रश्न मोदी सरकारच्या काळात वारंवार पडतो आहे. इंधनावरील उत्पादन शुल्कात करण्यात आलेल्या वाढीतून केंद्र सरकारने गेल्या काही वर्षांत 35 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिकची रक्कम वसूल केली आहे. म्हणजे याचाच अर्थ कच्च्या तेलाच्या किमती घसरल्याने जनतेच्या खिशात जे 35 लाख कोटी रुपये जाणार होते ते सरकारने परस्पर काढून घेतले आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाचे भाव आणि देशातील पेट्रोल, डीझेलचे दर यावर आता कोणीच चर्चा करतांना दिसत नाही किंबहुना ती चर्चाच होऊ दिली जात नाही. जनतेला अंधारात ठेवून मुस्कटदाबी करण्याचे हे अजब तंत्र सरकारने अवलंबले असले, तरी माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात कोणत्या ना कोणत्या मार्गाने जनतेपर्यंत ही माहिती पोहोचतच असते. त्यामुळे जनता अजूनही शांत दिसत असली तरी तिच्या मनात या सगळ्या भीषण आर्थिक संकटाविषयी संतापाची भावना आहे. त्या भावनेचा उद्रेक होण्याची वाट सरकार पाहात आहे का, असा प्रश्न या निमित्ताने विचारावा लागेल. मध्यंतरी राघव चढ्ढा यांनी संसदेत भाषण करतांना मानवी जीवनाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या ज्या सहा प्रमुख अवस्था आहेत, त्या प्रत्येक टप्प्यावर जनतेला कसा कर भरावा लागतो याचे तपशीलवार विवेचन केले होते. इतकी सगळी करवसुली करूनही सरकारने नागरिकांना एक तरी उत्तम दर्जाची सुविधा पुरवली आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता आणि तो अत्यंत रास्त आहे. जर जनतेला जागतिक दर्जाची आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा किंवा अन्य सार्वजनिक सुविधा यापैकी एकही सुविधा मिळत नसेल आणि तरीही सरकार फक्त विविध मार्गाने भरमसाठ वसुलीचाच मार्ग अवलंबत असेल तर मग सरकारकडे जमा होणारा इतका महाप्रचंड कर महसूल नेमका जातो तरी कुणाकडे हा प्रश्न वारंवार निर्माण होतो. काही ठराविक उद्योगपतींना सवलतीची खैरात होते, त्यांचे लाखो कोटी रुपयांचे कर्ज माफ होते यावर रोजच आक्षेप नोंदवले जात आहेत. मग यापैकी एकही सुविधा मिळत नसेल आणि तरीही सरकार फक्त विविध मार्गाने भरमसाठ वसुलीचाच मार्ग अवलंबत असेल तर मग सरकारकडे जमा होणारा इतका महाप्रचंड कर महसूल नेमका जातो तरी कुणाकडे हा प्रश्न वारंवार निर्माण होतो. काही ठराविक उद्योगपतींना सवलतीची खैरात होते, त्यांचे लाखो कोटी रुपयांचे कर्ज माफ होते यावर रोजच आक्षेप नोंदवले जात आहेत. मग जनतेला अशाच सवलती का मिळत नाहीत. जनतेने फक्त कर भरायचा आणि सरकारशी संबंधित असलेल्या ठराविक उद्योगपतीने मजा मारायची हे असे किती दिवस चालणार, याचा आता सोक्षमोक्ष लावण्याची वेळ आली आहे. सहकारी सोसायट्यांच्या मेंटेनन्सवर 18 टक्के जीएसटी हा अतिरेकीपणाचा कळस आहे. ■ ■

बहुजन सौरभ

---

*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीचे प्रमुख केंद्र नागपूर राहिले आहे. 1920 ते 1956 या कालावधीत त्यांनी अनेकदा भेटी दिल्या. सावलीसारखी सोबत करणारे जिवाभावाचे सगेसोयरे मिळाल्यामुळे नागपूर शहराशी त्यांचे अतूट ऋणानुबंध जुळले.*

# डॉ. आंबेडकरांचा नागपूरला पदस्पर्श





मिलिंद मानकर
मो. 8080335096

कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरच्या मीना बाजारात (आताचे कस्तूरचंद पार्क) बहिष्कृत हितकारिणी सभेचे 1920 साली अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाला डॉ. बाबासाहेब नागपूरला आले होते. ही त्यांची पहिली भेट होती. जेव्हा जेव्हा डॉ. बाबासाहेब नागपुरात यायचे तेव्हा तेव्हा त्यांची सभा कस्तूरचंद पार्कावर होते असे. एकदा ते म्हणाले होते, 'मी लढाई हरलो पण युद्ध जिंकणार' हे त्यांचे बोल 'जनता' पत्रकात प्रसिद्ध झाले. भाषण सुरू असताना एकाने प्रश्न विचारला, 'बाबा, तुम्ही म्हणता की, मी लढाई हरलो पण युद्ध जिंकणार' लढाई आणि युद्ध हे शब्द एकच आहेत. यावर डॉ. बाबासाहेब म्हणाले, ''लढाई म्हणजे गांधीने प्राणांतिक उपोषण धरले होते. तेव्हा काँग्रेसवाले लोक माझ्या पायावर लोटांगण घालून विनंती करून म्हणत होते की, बाबा गांधीजींचे प्राण वाचवा. कस्तुरबा गांधी पदर पसरून रडत म्हणायची की 'बाबा माझ्या पतीचे प्राण वाचवा' ही त्यांच्या रडण्याची लढाई मी हरलो. पण पुढचे युद्ध मी जिंकणार हे निश्चित.''

1922 साली लंडनचा बादशाह पंचम जॉर्ज यांचा मोठा मुलगा नागपूर रेल्वे स्टेशनचे उद्घाटन करण्यासाठी आला होता. त्यावेळी डॉ. आंबेडकर सरकारी पाहुणे म्हणून उपस्थित होते. तेव्हा ते विद्यार्थीदशेत होते. नागपुरात त्यांचा कोणशीही विशेष परिचय नव्हता. तरीपण भीमराव नावाचा एक अस्पृश्य मुलगा युवराजासोबत आला आहे. शिक्षणात तो फार हुशार आहे. त्यांच्यासारखा विद्वान भारतात नाही, अशा प्रकारची वार्ता त्यावेळी जनतेत पसरली होती. त्यामुळे त्यांना पाहण्यासाठी लोकांनी नागपूर रेल्वे स्टेशनवर गर्दी केली होती.

व्यंकटेश थिएटर (पूर्वीची शाम टॉकीज) नागपुरात चिटणीस पार्कला लागून होते. नागपूरवासीयांनी डॉ. बाबासाहेबांचे या ठिकाणी 8 ऑगस्ट 1930 रोजी भव्य स्वागत केले. डॉ. बाबासाहेबांना गोलमेज परिषदेकरिता लंडनला जायचे होते. त्यानिमित्त अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेबांना नागपुरात आणणारे प्रमुख कार्यकर्ते सावजी मून, किसन फागोजी बनसोड, पतितपावन तुलारामजी साखरे, हेमचंद्र खांडेकर, संभाजी गोडघाटे, रामधन माटे, अंतुजी भगत, कवाडे गुरुजी, बाबू एल. एन. हरदास आणि रावसाहेब ठवरे हे प्रमुख होते.

बहिष्कृत हितकारिणी सभेचे अधिवेशन 1932 साली कामठीत आयोजित करण्यात आले होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष बाबू एल. एन. हरदास होते. अधिवेशनासाठी डॉ. बाबासाहेब 8 मे 1932 रोजी नागपुरात आले. रेल्वे स्टेशनहून डॉ. बाबासाहेबांना सरळ इंदोऱ्यातील जी. टी. मेश्राम यांच्या निवासस्थानी आले. डॉ. बाबासाहेब आल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. डॉ. बाबासाहेबांना पाहण्यासाठी आणि भेटण्यासाठी चारशे-पाचशे लोकांचा जनसमुदाय जमला होता. समुदायाच्या आग्रहास्तव डॉ. बाबासाहेबांनी छोटेखानी भाषण दिले. त्यावेळी ध्वनीक्षेपक नव्हता. डॉ. बाबासाहेब म्हणाले, 'ही वस्ती पाहून मला आनंद झाला आहे. ही वस्ती म्हणजे दलितांचा बालेकिल्ला आहे. आता मी छेडलेली लढाई जिंकण्याचा माझ्यात विश्वास निर्माण झाला आहे. मला शक्ती मिळाली आहे. आता मला माझ्या ध्येयापर्यंत जाण्यासाठी कोणीही रोखू शकत नाही. तुम्ही शिक्षण घ्या, एकी करा. संघटित रहा' असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला होता. नागपूर जिल्हा कचेरीच्या पूर्वेस सिव्हील महापालिकेच्या सभोवताल असलेल्या पटांगणात 1942 साली अ.भा. दलित वर्ग महिला परिषद भरली होती. या ठिकाणी डॉ. बाबासाहेबांनी 18 जुलै 1942 रोजी इंग्रजीत पहिले भाषण दिले. अध्यक्षस्थानी रावबहादुर एन. शिवराज होते. त्याचवेळी 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना करण्यात आली. 19 जुलैला डॉ. बाबासाहेबांचे दुसरे भाषण मराठीत झाले. अध्यक्षस्थानी दशरथ पाटील होते. या परिषदेला 75 हजाराचे वर जनसमुदाय उपस्थित होता. त्यापैकी 25 हजार दलित महिला होत्या. सभामंचावर डॉ. बाबासाहेब आणि इतर प्रमुख पुढारी मंडळी होती. त्यांच्या उपस्थितीत दलित महिला ठरावावर समाजातील प्रभावी अशा दहा समाजसेवी महिलांची डॉ. बाबासाहेबांसमोर भाषण करण्यासाठी निवड करण्यात आली होती. प्रभावती रामटेके यांनी 'विधवा विवाह' विषयावर भाषण केले होते.

नागपुरातील काही अनुयायी कायद्याच्या कचाट्यात सापडले होते. तेव्हा खुद्द डॉ. बाबासाहेब त्यांच्यासाठी धावून आले. कायदेशीर बाजू न्यायालयात मांडली आणि त्यांना निर्दोष सोडवले. बाबा मुक्तावनदास यांना खुनाच्या प्रकरणात गोवण्यात आले होते. 1950-52 ची गोष्ट. त्याकाळी खुनाची ती घटना बरीच गाजली होती. कोणताच वकील त्यात हात टाकण्यासाठी धजावत नव्हता. अशावेळी डॉ. बाबासाहेबांनी अनुयायांची बाजू मांडण्याचा निर्णय घेतला. खास या प्रकरणासाठी नागपुरात आले होते. उच्च न्यायालयात प्रकरण सुरू होते. भंडारा लोकसभेच्या पोटनिवडणुकीसाठी 20 एप्रिल 1954 रोजी डॉ. आंबेडकरांचे सोनेगाव विमानतळावर आगमन झाले. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांच्या स्वागतासाठी पारवेकरांची हिरव्या रंगाची नवी मोटारकार हितवादचे प्रमुख वार्ताहर घोष आणि हितवादचे कर्मचारी राम फुलझेले यांच्या प्रयत्नांनी मिळवून त्यात प्रल्हाद मेंढे, एकनाथराव गोडघाटे, राम फुलझेले, शामराव साळवे, दौलत पाटील आणि पांडुरंग हाडके इत्यादी कार्यकर्ते विमानतळावर स्वागतासाठी गेले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांचा मुक्काम सदरच्या माउंट हॉटेलमध्ये होता. 2 मे 1954 रोजी डॉ. बाबासाहेबांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. उपस्थितांसमोर अतिशय मौलिक भाषण दिले होते. लष्करीबागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाहीर भाषणाचा कार्यक्रम 25 डिसेंबर 1950 रोजी बाबू हरिदासजी आवळे यांच्या घराजवळील विस्तीर्ण पटांगणात आयोजित करण्यात आला होता. पटांगणावर कुंपण टाकण्यात आले होते. डॉ. बाबासाहेबांच्या भाषणासाठी तिकीट होते. अतिशय कडेकोट बंदोबस्तात कर्नलबागचे प्रल्हाद मेंढे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली समता सैनिक दलाने मंचकाची आणि डॉ. बाबासाहेबांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारली होती. मंचकावर कापडी गुलाबी रंगाचे कमळ बनविले होते. कमळाच्या पाकळ्यात डॉ. बाबासाहेबांची तेजःपुंज मूर्ती दिसत होती. नागपूरच्या दीक्षा समारंभासाठी गुरुवार 11 ऑक्टोबर 1956 रोजी डॉ. बाबासाहेबांचे सकाळी सोनेगाव विमानतळावर आगमन झाले. त्यावेळी सीताबर्डीवरील श्याम हॉटेलातील खोली क्रमांक 116 मध्ये त्यांचा मुक्काम होता. धम्मक्रांतीचा सोहळा संपन्न होईपर्यंत डॉ. बाबासाहेब या हॉटेलात मुक्कामाला होते. डॉ. बाबासाहेब पहिल्या माळ्यावरील या रूममध्ये थांबले होते. दुसऱ्या माळ्यावरील एक रूम मुकुंदराव (पुतण्या) आणि यशवंतराव (बाबासाहेबांचे चिरंजीव) यांचेसाठी बुक करण्यात आली होती. हॉटेलच्या बाजूला असलेल्या कोठारी भवनात भारतीय बौद्धजन परिषदेचे कार्यालय होते. हॉटेलसमोर असलेल्या आनंद नगरातील तत्कालीन कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीच्या सोहळ्यात हिरीरीने भाग घेतला होता. याच वस्तीतील राधाबाई कांबळे आणि वराळेबाईने डॉ. बाबासाहेबांना 'लांब रोट्या' खाऊ घातल्याची माहिती चरणदास चिकाटे यांनी दिली. त्यावेळी ते चौदा वर्षाचे असावेत. डॉ. बाबासाहेब 1857 नंबरच्या गाडीने आल्याचे त्यांनी आपल्या डोळ्याने पाहिल्याची आठवणही सांगितली. सकाळपासून ते रात्रीपर्यंत कर्नलबागेतील समता सैनिक दलाचे कार्यकर्ते डॉ. बाबासाहेबांच्या खोलीवर अंगरक्षक म्हणून काम करीत होते. ज्यात - प्रल्हाद मेंढे, एकनाथराव गोडघाटे, शामराव साळवी, राम फुलझेले, दौलतराव पाटील, पांडुरंग हाडके, संपतराव गोडघाटे, बाबुराव पाटील, लक्ष्मणराव कुत्तरमारे आणि विश्वनाथ सावरकर प्रमुख होते. धम्मक्रांतीच्या घटनेचे सूत्रधार वामनराव गोडबोले यांचेसह पंडित रेवाराम कवाडे, मा. डो. पंचभाई यांचेही मोठे योगदान राहिले आहे.

ही सर्व झपाटलेली मंडळी ज्यांनी 1956 च्या धम्मक्रांतीची धुरा आपल्या खांद्यावर पेलून धरली होती. ही सर्व त्या काळात येथे जमली होती. डॉ. बाबासाहेबांनी दीक्षाभूमीवर 14 ऑक्टोबर 1956 रोजी ब्रह्मदेशाचे महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बुद्धधम्माची दीक्षा घेऊन अभूतपूर्व धम्मक्रांती केली. 15 ऑक्टोबरला नागपूर महानगर पालिकेचे मानपत्र स्वीकारले. 16 ऑक्टोबरला चंद्रपूरचा दीक्षा समारंभ आटोपून रेल्वेने परत नागपुरात आले. नवी दिल्लीला जाण्यासाठी डॉ. बाबासाहेब पत्नी माईसाहेब आंबेडकर, नानकचंद रत्तू यांच्यांसोबत सोनेगाव विमानतळावर पोहोचले. जड अंतःकरणाने नागपूर शहराचा आणि कार्यकर्त्यांचा निरोप घेतला. आयुष्यभर मायेच्या ममतेने कुरवाळणारा जन्मदाता आपल्यापासून दूर जात आहे म्हणून कार्यकर्ते गहिवरले होते. त्यांच्या डोळ्यातून सारखे अश्रू ओघळत होते. 18 ऑक्टोबर डॉ. बाबासाहेबांची अखेरची नागपूर भेट होती. डॉ. बाबासाहेबांना विमानात काठी नेता आली नाही. 'एअरोड्रोम ऑफीसर' ती काठी घेऊन ऑफीसात निघाले होते. त्यावेळी मेंढे गुरुजींनी काठी हस्तगत केली आणि आपल्या कर्नलबागेतील निवासस्थानी आयुष्यभर 'बाबासाहेबांचे स्मृतिचिन्ह' म्हणून जिवापाड जतन केली. दरवर्षी 14 एप्रिलला ती काठी जनतेच्या दर्शनासाठी ठेवण्यात येते.

डॉ. बाबासाहेबांच्या नागपूर भेटीच्या अनेक हृदयंगम आठवणी स्मृतिशेष चंद्रनाग नारनवरे यांच्या 'नागांच्या नागपुरातील बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जुन्या आठवणी' या पुस्तकात आजही वाचावयास मिळतात. नारनवरे यांनी महाड चवदार तळ्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात 20 मार्च 1977 रोजी ही पुस्तक प्रसिद्ध केली होती. ■ ■

---

# भगवान बुद्धांच्या धम्मातील विज्ञानवाद





प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. ९१३००८८०९५

याचे स्पष्टीकरण वासेष्ठ व भारद्वाज या दोन ब्राह्मणांबरोबर तथागतांच्या झालेल्या संवादातून लक्षात येतो. वासेष्ठ व भारद्वाज यांच्यात मुक्तीचा सत्य मार्ग कोणता व असत्य मार्ग कोणता यासंबंधी विवाद उत्पन्न झाला. त्यावेळी तथागत आपल्या भिक्खू संघासमवेत कोशल जनपदातील अचिरवती नदीच्या तटावरील आम्रवनात थांबले होते. भारद्वाज आणि वासेष्ठ तथागतांजवळ आले; भारद्वाज तथागतांना म्हणाला, तरुख याने दाखवलेला मार्ग सरळ मार्ग आहे, तो मुक्तीच्या मार्ग आहे, तो मार्ग बह्मसायुज्य मिळवून देतो. वासेष्ठ म्हणाला, हे गौतम पुष्कळशी ब्राह्मण अध्वरयू ब्राह्मण, तैतरीय ब्राह्मण, कंछोक ब्राह्मण त्याचप्रमाणे भिह्युवर्गीय ब्राह्मण हे प्रत्येक जण आपल्या मार्गाने बह्म सायुज्य मिळते असे म्हणतात. एका नगराला अनेक रस्ते असतात, या सर्व ब्राह्मणांनी दाखवलेले मार्ग शेवटी ब्रह्मसायुज्य कडेच नेतात. यावर बुद्ध वासेष्ठला प्रश्न करतात, या तीनही वेद जाणणाऱ्या ब्राह्मणांपैकी एकाने तरी ब्रह्माचे साक्षात समोरासमोर दर्शन घेतले आहे काय? या ब्राह्मणांच्या गुरुने तरी ब्रम्हाला समोरासमोर पाहिले आहे काय ? कोणीही ब्रह्म पाहिला नाही. कोणाला बह्म साक्षात्कार झाला नाही. तर मग तू हे कसे सांगतोस की ब्राह्मण सांगतात ते सत्त्यावरच आधारलेले आहे? वासेष्ठ, ईश्वरावरील विश्वास म्हणजे एकमेकांना धरून चालणारी आंधळ्यांची माळ होय. ब्रह्मसायुज्य म्हणजे कधी न पाहिलेल्या स्त्रीवर प्रेम करण्यासारखे आहे. तथागतांच्या विचारानुसार, ईश्वराच्या अस्तित्वाच्या सिद्धांतासंबंधी चर्चा करण्यापासून काहीही सत्य किंवा लाभ नाही. तथागतांच्या मते, धर्माचे केंद्र हे मनुष्याचा देवाशी असणारा संबंध यामध्ये नाही; ते माणसा-माणसाच्या संबंधात आहे. धर्माचा हेतू सर्व माणसे सुखी होतील अशा रीतीने माणसाने माणसाशी कसे वागावे हा आहे.

तथागत देवाच्या अस्तित्वावरील विश्वासाविरुद्ध असल्याचे आणखी एक कारण आहे; तथागत धार्मिक क्रियाकल्पाच्या विरुद्ध होते. याचे कारण म्हणजे क्रिया- कलप म्हणजे भ्रामक समजूतीचे आगरच आहे आणि या ब्राह्मक समजुती अष्टांग मार्गातील जे महत्त्वाचे तत्व सम्मादीठी म्हणजेच सम्यक दृष्टी हिच्या शत्रू आहेत. तथागतांच्या दृष्टीने ईश्वरावरील विश्वास ही अतिशय भयानक गोष्ट आहे; कारण ईश्वरावरील विश्वास हा पूजा आणि प्रार्थना यांचा उत्पादक आहे. पूजा आणि साधना यांच्या जरुरीतून पुरोहितपद उत्पन्न होते आणि पुरोहित हा असा दुष्ट बुद्धीचा आहे की तो सर्व प्रकारच्या खुळ्या समजुती निर्माण करतो. त्यामुळे सम्मादिठीचा विकास अशक्य होतो. बुद्धाच्या मते कोणतीही गोष्ट सत्य म्हणून स्वीकारण्याला तिला काही ना काही प्रमाण असले पाहिजे. प्रमाणाचे प्रत्यक्ष आणि अनुमान हे दोन प्रकार आहेत. ब्रह्म किंवा ईश्वर या दोन्ही प्रकारात बसत नाही.

एकंदरीत बुद्धांचा जो तिसरा उद्देश आहे. ज्या भ्रामक समजुती माणसाची शोध लावण्याची प्रवृत्ती मारतात, त्याचे उगमस्थान ईश्वर असावे. नव्हे तर ते आहेच म्हणून बुद्धाने ईश्वराचे अस्तित्व प्रमाण प्रकारातून नाकारले व ते वासेष्ठ, भारद्वाज या ब्राह्मणांशी केलेल्या संवादात अनेक उदाहरणावरून सिद्धही केले. यावरून बुद्धाचा मानस माणसाला बुद्धीवादी असल्याचे सिद्ध करून स्वतंत्रतापूर्वक सत्याचा शोध लावण्यात सिद्ध करण्याचे होते. बुद्धाच्या विचारातील हा विज्ञान माणसाची सम्यकदृष्टी जागृत करतो, म्हणजेच माणसाला कार्यकारण भावाकडे नेतो.

भगवान बुद्धांनी अनेकांना दिलेले उपदेश व सांत्वनही विज्ञानवादी सत्यावरच आधारलेले होते. उदाहरणादाखल द्यायचे झाल्यास किसा गौतमीचे बुद्धाने केलेले सांत्वन लक्षात घेण्यासारखे आहे. किसा गौतमी श्रावस्तीच्या व्यापाराची सून होती. विवाहानंतर थोड्या काळाने तिला पुत्र झाला. परंतु तो चालता फिरता असताना सर्पदंशाने त्याचा मृत्यू झाला. आपल्या मुलाच्या मृत्यूवर तिचा विश्वासच बसेना. कारण यापूर्वी तिने मृत्यू कधीच पाहिला नव्हता. ती आपल्या पुत्राचे कलेवर म्हणजे शरीर घेऊन ती वेड्यासारखे घरोघर फिरू लागली. शेवटी एका वृद्धाने तिला तथागतांकडे जाण्यास सांगितले. ती आपल्या पुत्राचे मृत शरीर घेऊन तथागतांकडे आली. तथागताने तिची सर्व हकीगत ऐकून तिला नगरात जाऊन एकही मृत्यू न झालेल्या घरातून मोहरी आणण्यासाठी सांगितले. तिला वाटले की अत्यंत सोपी गोष्ट आहे ती प्रत्येक घरी जाऊ लागली. पण तिला मृत्यू न झालेले एकही घर सापडेना. शेवटी ती रिकाम्या हाताने तथागतांकडे परत आली. तथागताने तिला समजाविले की मृत्यू हा सर्वांच्याच नशिबी असतो. दुर्दैवी घटना तिच्याच बाबतीत घडली म्हणून तिने शोक का करावा? भगवान बुद्धांनी प्रत्यक्ष करवून घेतलेल्या कृतीमुळे तिला जीवनाचे सत्य उमगले. तिने आपल्या पुत्राचा अंत्यविधी केला व करताना ती म्हणाली, सर्व नश्वर आहे; हा सृष्टी नियम आहे. किसा गौतमीला सृष्टी नियम सांगताना बुद्धाने प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे तिला वास्तवाचे ज्ञान करून दिले. त्यांनी तिला लगेच सरळ उत्तर दिले नाही किंवा कोणत्याही चमत्काराचे आश्वासनही दिले नाही.

बुद्धांनी सांगितलेला हा सृष्टी नियम सत्याचा शोधापर्यंत किसा गौतमीला पाठवूनच सांगितला. यालाही बुद्धाचा प्रत्यक्ष वाद किंवा विज्ञानवादच म्हणता येईल. बुद्ध एका अंगाने आध्यात्मिक किंवा धार्मिक जरी वाटत असले तरी ते चमत्कारिक किंवा दांभिक साधू नव्हते. तर जीवनाचे वास्तव सत्य प्रत्यक्ष अनुकृतीतून समजावून देणारे प्रत्यक्ष विज्ञानच होते आणि म्हणून भारद्वाज व वासेष्ठ यांना ईश्वराचा कल्पनाश्रित विचार किंवा किसा गौतमीला मृत्यूचे सत्य त्यांनी अत्यंत सुरेख पद्धतीने प्रत्यक्ष उदाहरणातून समजावून दिला. जीवनात दुःख आहे हे सांगताना तथागत बुद्ध माणसाला निराशावादाकडे अजिबात नेत नाही तर दुःखाचे कारण अज्ञान असल्याचे सांगत या अज्ञानापासून दूर होऊन ज्ञानी झाल्यास माणूस आनंदमय सत्यापर्यंत जाऊ शकतो. क्रमशः ■ ■

---

# अथांग ज्ञानाचा महासागर डॉ. बाबासाहेब आंबेडकर



वर्तमानात उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात कार्यरत न्यायाधिशांना भारतीय संविधान हे मार्गदर्शक तथा निर्णय प्रक्रियेत आधारभूत असे महान एकमेव गौरवविण्यात आलेले महान ग्रंथ म्हणजे भारतीय संविधान होय. डॉ. बाबासाहेबांच्या लेखणीतून भारत देश अखंड रहावा आणि समाज परिवर्तन घडण्यासाठी दूरदृष्टी ठेवून संविधानाची प्रस्तावना आणि भूमिका अत्यंत महत्वाची आहे. एवढेच नव्हे तर संविधानाती मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे हा भारतीय संविधानाचा आत्मा आहे. संविधानामुळे स्वातंत्र्यानंतर भारताच्या सर्वांगीण विकासासाठी नव्या उर्जेने चालना मिळाली. अनेक संकटावर भारत मात करून विकासाच्या दिशेने अमृत महोत्सवाकडे वाटचाल करतांना भारताची अखंडता आणि वैज्ञानिक दृष्टीकोन, सकारात्मक विचाराने पुढे जात आहे. अंतर्गत आव्हाने कितीही असले तरी, भारतीय संविधानाच्या निमित्ताने मांडलेले विचार भविष्यकाळातील जीवन संघर्ष आणि आव्हानांना पेलण्यासाठी पुरेसे आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मानवी मूल्ये रूजविण्यासाठी आणि शांतता राष्ट्रात अबाधित राहण्यासाठी सर्वांनी आपले कर्तव्य बजावले पाहिजे, ही धारणा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. भारत हे निधर्मी म्हणजे धर्मनिरपेक्ष राष्ट्र, असून सर्व धर्मांचा आदर, मानसन्मान करणारे महान राष्ट्र आहे. राष्ट्राची एकता, समता आणि अखंडता ही भारताची गुणवैशिष्टे आहेत. भारता विविध धर्माचे, पंथाचे, पक्षाचे, जातीचे, जमातीचे लोक असूनही भारत विकसनशील राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर स्वाभिमानाने पुढे वाटचाल करीत आहे. भारत हा युवक-युवतीचा देश आहे. युवाशक्तीचे पाठबळ असलेल्या भारताचे भूषण आहे. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर ज्ञान संपादन करणे अत्यावश्यक आहे. वाचाल तर वाचाल. वाचन संस्कृतीला अत्यंत महत्व आहे. जोपर्यंत आपण त्या क्षेत्रातील ज्ञान संपादन करण्यासाठी वाचन करणार नाही, तोपर्यंत यश प्राप्त होणार नाही. डॉ. बाबासाहेबांचा वाचन दांडगा होता. ज्ञानाचा अथांग महासागर म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेबांनी देशातच नव्हे तर विदेशातही त्यांच्या कर्तृत्वाची, ज्ञानाची दखल घेण्यात आली. ऑक्सफर्ड विद्यापीठाने संपूर्ण विश्वात मानवाच्या उत्थानाकरिता कार्य करणाऱ्या शंभर महान पुरूषांची सूची तयार करण्यात आली. उपरोक्त सूचीमध्ये विश्वातील महापुरूषांच्या सूचित पहिल्या क्रमांकावर शांतीचा संदेश देणारे तथागत बुद्ध आहेत. दुसऱ्या क्रमांकावर वर्धमान महावीर, तृतीय क्रमांकावर चक्रवर्ती सम्राट अशोक, चतुर्थ क्रमांकावर भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आहे तथा कोलंबिया विद्यापीठाने 'द सिम्बॉल ऑफ नॉलेज' असे लिहून त्यांना गौरविण्यात आले. तसेच इंग्लंड येथे ज्या घरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राहत होते, त्या घरावर सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते डॉ. भीमराव आंबेडकर अशाप्रकारे अक्षरांनी त्यांना कोरले गेले आहेत. पीएचडी करिता 'द प्रॉब्लेम ऑफ रूपी हा प्रबंध लंडन विद्यापीठात डॉ. बाबासाहेबांनी सादर केला होता. तदनंतर सन 1922 साली सदरील विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी डॉ. बाबासाहेबांना प्रदान केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विसाव्या शतकातील महान समाजसुधारक, व्हिजनरी महामानव होते. अस्पृश्यता, अंधश्रद्धा, अनंत पाप, दारिद्र्यात पडलेला, वर्णव्यवस्थेचा बळी, शुद्र-अतिशुद्र समाज, शिक्षणाचा गंध नसलेला धरतीचा पुत्र, जंगलव्याप्त परिसरात अतोनात परिश्रम करणारा समाज, डोंगर कपारीत अडकलेला समाज, स्त्रियांची होत असलेली दिवसेंदिवस हानी, बलात्कार, सर्वांगाने पिडीत महिलांचे उद्धारकर्ते, अथांग ज्ञानाचे महापुरूष, ज्ञानाचे प्रतिक, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. आंबावडे या गावी सपकाळ कुटूंबाचे वास्तव्य फार पुर्वीपासून होते. याच सपकाळ घराण्यातील डॉ. आंबेडकर यांचे आडनाव बदलण्याची प्रक्रिया वास्तविकतेकडे नेणारी असून त्या घटनेला ऐतिहासिक महत्व आहे. डॉ. बाबासाहेबांचे सातारा येथील प्रतापसिंह शाळेत प्रवेश घेतांना आंबडवेकर अशी नोंद 7 नोव्हेंबर 1900 ला त्यांच्या वडिलांनी केले. 7 नोव्हेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिवस म्हणून साजरा केला जातो. प्रतापसिंह येथील शाळेत डॉ. बाबासाहेबांना शिकविण्यासाठी आंबेडकर नावाचे शिक्षक कार्यरत होते. शिक्षकांचे मुलांकडे पाहण्याचा दृष्टीकोण सकारात्मक तथा समानतेचा असतो. बालकरूपी भीमावर गुरूवर्य आंबेडकरांचे लक्ष केंद्रित झाले. विद्यार्थ्यांवरील प्रेम तथा गुरूचे असलेले आशिर्वाद यामुळे पुढे तेच विद्यार्थी भविष्यात मोठे होतात. सूर्याप्रमाणे तेजस्वी मुले गाव, समाज, शहर तथा राष्ट्राचे नाव अजरामर करतात. लहानपणापासून बालक भिम हुशार, बुद्धिमान, चाणक्ष, अभ्यासात मन लावणारे, आज्ञाधारक विद्यार्थी असल्याने शिक्षक आंबेडकर यांचे सातत्याने लक्ष होते. गुरूचा लाडका असल्याने भीमाची काळजी घेत होते. वेळप्रसंगी गुरूजी स्वतः लाडक्या विद्यार्थ्यासाठी घरून भाजी भाकरी आणत असत. शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते अतुट असते. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यातील सुरेख संगम म्हणजे आदर्श विद्यार्थी असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही.

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे जनक तथा जागतिक मान्यता असलेले हुशार, बुद्धीमान, संविधानतज्ञा होते. अनेक देशातील संविधानाचे गाढे अभ्यासक होते. त्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले, संविधान सभेत विविध प्रश्नाची उत्तरे डॉ. बाबासाहेबांनी स्वतः दिलेली आहेत.*

भीमबालकाचे शाळेच्या नोंदवहीत आंबडवेकर हे आडनाव हजेरी घेतांना किंवा उच्चारतांना अर्थबोध होत नव्हता. म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर अशी बोलकी सूचना आपल्या लाडक्या विद्यार्थ्याला म्हणजे बालक भिमाला सांगितले. आदर्श बुद्धीमान बालक भीमाने त्वरीत होकार दिला. त्याक्षणापासुन बालभीमाचे आडनावात आंबावडेकर ऐवजी आंबेडकर झाले. ही नोंद शाळेच्या नोंदवहीत झालेली आहे. अशा प्रकारे आंबडवे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गाव त्यांच्या आडनावामुळे आणि त्यांच्या मूळगावामुळे जगाच्या नकाशावर प्रसिद्ध झाले हे विशेष. अलिकडे आंबडवे हे गाव खासदार मा. अमर साबळे यांनी उपरोक्त गाव दत्तक घेऊन आंबडवे गावाचा विकास हाती घेतला आहे. महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे हे गाव मंडणगड तालुक्याच्या स्थानकापासून सतरा किमी अंतरावर आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात अशी एक म्हण खेड्यापाड्यात प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे बालक भीम यांची आवड शिक्षणाकडे असल्याने त्यांचे वडिल रामजी सुभेदारांनी ओळखले व त्यांनी त्यांच्या शिक्षणाकडे लक्ष घातले. भीमराव शिकून मोठा व्हावा, शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांना मनोमन वाटत होते. डॉ. बाबासाहेबांचे वडिल कबिर पंथी असून धार्मिक होते. बालपणापासून वाचन संस्कार, संस्कृती, जनजीवन, याविषयीचे अथांग ज्ञानाची आळख वडील रामजी करून देणारे हिमालय पर्वतासारख्या उच्च विचारांच बाप नावाचा माणूस होता. संगोपन करण्यासाठी संघर्षाच्या प्रत्येक वळणावर आत्या होती. म्हणूनच महु व्हाया आंबाडवे, मुंबई ते दिल्ली पर्यंतचा प्रवास आणि जीवन संघर्ष बाबासाहेब डॉ. भीमराव रामजी आंबेडकर सर्वहारा भारतीय समाज व्यवस्थेचे बदलत्या नव्या भारतीय समाजाचे जनक्रांतीनायक, महानायक, भारतरत्न, विश्वरत्न, प्रेरणास्थानी आहेत आणि भविष्यातही राहतील. महान संशोधक, भारतीय संविधानाचे शिल्पकार, समाजशास्त्रज्ञ म्हणून जगभर ख्याती होती असे डॉ. बाबासाहेब येणाऱ्या पिढीचे आधारस्तंभ तथा ज्ञानाचे अथांग महासागर म्हणून स्वतंत्र ओळख जगात प्राप्त झाली. रक्ताचा एकही थेंब न सांडता जगाच्या इतिहासात कोरलेली 14 ऑक्टोबर 1956 ची नागपूर च्या दीक्षाभूमीवर घडवून आणलेली धम्मक्रांती होय. धम्म म्हणजे आदर्श आचार संहिता. धर्म आणि धम्म यामधे जमिन आकाश एवढे अंतर आहे. धम्म हे इच्छाशक्तीचे अस्त्र आहे. धर्माचे तसे नाही. धर्म कोणीही घेवू शकतो, म्हणजे धर्मांतर करू शकतो. धम्म हा आचरणाचा मुख्य भाग आहे. बौद्ध धम्म हा बुद्धीप्रामाण्यवादाचा मुळ आधार आहे. विज्ञानाच्या कसोटीवर धम्म आचरणाने सिद्ध करता येतो. धम्मात धागेदोरे, कर्मकांड, मुर्तीपूजा नाही, नारळ, पुजेच्या पुड्या नाही. असिम श्रद्धा आणि आत्मविश्वासाचा मुख्य भाग आहे. बौद्ध धम्माचे संस्थापक राजा शुद्धोधनाचा मुलगा राजकुमार सिद्धार्थ आहेत. मानव दुःखमुक्त का होत नाही? मानव कायमचा दुःखापासून मुक्त व्हावा यासाठी राजकुमार सिद्धार्थ यांनी पहिल्यांदा राजमहल, सुखाचा त्याग करून संन्यास घेतला, ही त्याच्या जीवन संघर्षाची कठोर परिक्षा म्हणावी लागेल. ज्ञानप्राप्तीसाठी पिंपळाच्या वृक्षाखाली ध्यानस्त झाले. शेवटी त्यांना ज्या वृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले त्या वृक्षाला बोधिवृक्ष असे म्हणतात. त्या क्षणापासून बुद्ध झाले. बुद्ध म्हणजे राग, द्वेष, मोह यापासून परावृत्त झालेला ज्ञानी पुरूष होय. ज्ञानाचा वापर शांतीच्या वाटेने दुःखावर मात करता येतो ही शिकवण, हा संदेश मानवी दुःखाचा मुक्तीदाता ठरला. म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी तथागत बुद्ध यांना प्रथम गुरू मानले. डॉ. बाबासाहेबांच्या तत्त्वानुसार शिक्षण हे माणसाला घडवित असते. माणूस घडविण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. शिक्षण म्हणजे ज्ञान आणि प्रज्ञा यांचा सुरेख संगम होय. संत गाडगेमहाराज या महान पुरूषाने 'शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ धोंडा' असे किर्तनातून शिक्षणाचे महत्त्व सांगितले. शिक्षण हे मानवाला शोषण, अन्याय, अत्याचारपासून मुक्त करणारे आधुनिक विज्ञान संगणक युगातील मानवतेचा जिवंत झरा. विज्ञानाच्या कसोटीवर प्रयोगातून सिद्ध करणारा सिद्धांत माणुसकीतून मानवताकडे उंच भरारी घेणारा मानव, शिक्षणामुळे मानव शोषणातून मुक्त होतो. युगानुयुगे गुलामगिरीत जगणारा माणूस एकविसाव्या शतकात उच्च शिक्षणामुळे डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, प्रोफेसर, शास्त्रज्ञ, आयएएस, आयपीएस, आ.आर.एस, आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसिलदार, शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, प्रबंधक, निरिक्षक इत्यादी सह शासन प्रशासनात मोठमोठी पदे भुषवित असून आधुनिक संगणक युगात योगदान सर्वच स्तरावर गौरवास्पद आहेत. ■ ■

आदिवासी अस्तित्व



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

---

## वाचकांचे विचारपिठ

## बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दीची दखल

आजचा दैनिक बहुजन सौरभ चा अंक पाहून अत्यंत आनंद झाला की बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे जन्मशताब्दी होत असताना नागपूर शहरातील अनेक वर्तमानपत्रांनी त्यांच्या जन्मशताब्दीची दखल घेतली नाही आणि साधे वृत्तांतही प्रकाशित केले नाही याबद्दल आम्हाला फार वाईट वाटले परंतु वाईट वाटण्यात अर्थ नाही आपण आपली व्यवस्था निर्माण केली पाहिजे म्हणून दैनिक बहुजन सौरभ ही आपली मीडिया आहे आपली प्रिंट मीडिया आहे या मीडियाने बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या संदर्भातील अनेक महत्त्वपूर्ण आणि विविध पातळीवर त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेऊन आमच्या वाचकांना एक मेजवानी दिली आहे. येणाऱ्या पिढीसाठी फार मोठे असे विचारधन दिलेले आहे. आम्ही उत्तर नागपूर परिसरातील सर्व महिला जन्मशताब्दी निमित्ताने जाहीर करतो की लवकरच उत्तर नागपूर शहरांमध्ये दैनिक बहुजन सौरभ साठी महिला पुढाकार घेतील आणि घरोघरी दैनिक बहुजन सौरभ लावा अशी सर्वांना विनंती करतील. पाच रुपयाकडे पाहू नका आपण अन्य पेपर घेतो आणि आपले डोके खराब करतो. दैनिक बहुजन सौरभ असा आहे की ते डोके जागेवर ठेवणारा वर्तमानपत्र आहे. आम्ही आज असा निर्धार व्यक्त केला की 9 एप्रिल बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त ने उत्तर नागपूर परिसरातील मोठ्या प्रमाणात असणाऱ्या बंधू-भगिनींना विनंती करणार आहेत की आपण आपल्या घरी दैनिक बहुजन सौरभ लावा. ■ ■

- सुनंदा कोचे

“ बोलतांना विचार करा, बोलून विचारात पडू नका. ”



# जीवनात अनपेक्षित आलेले दुःख तेव्हा...

**माणसाच्या जीवनात सुख असता, असता अचानक दुःख आले तेव्हा त्याची काय प्रतिक्रिया असेल. तेव्हा त्याच्याकडे पहा. त्याला पूर्वी असलेल्या दुःखी माणसाचा चेहरा आठवेल की ज्याने अतिशय कठीण प्रसंगी त्याला मदत मागितली होती आणि त्याची देण्याची क्षमता असतांना ही नाकारली, का?**




कारण त्याला वाटले की आपल्याकडे भरपूर पैसा आहे, घर आहे, शेती आहे, जमा पुंजी आहे. आपल्याला कोणाचीही गरज नाही. असे त्यातील अहंकारमुळे तो समजत होता. तो दवाखान्यात भरती असतांना रक्ताची गरज भासली. कोणीही खून द्यायला तयार नाही. डॉक्टरनी सांगितले की याला एक तासाच्या आत रक्त दिल्या गेले नाही तर त्याचा मृत्यू नक्कीच आहे. मग जेव्हा माणूस हा शेवटची घटका मोजतो त्यावेळी त्यातील अहंकार नष्ट होतो. त्याला वाटते आपण केलेल्या चुका मान्य केल्या पाहिजे. त्यासाठी आपण त्या व्यक्तीची माफी मागण्यासाठी पत्नीला त्याला फोन करून बोलावण्याची विनंती करतो. तिच्या पतीने त्यावर आलेल्या संकट प्रसंगी मदत केली नाही. त्यामुळे तो नाराजच असेल आणि तो माझ्या पतीचा चेहरा देखील पाहण्याचे टाळेल असे तिला वाटले. त्यामुळे ती तिच्या पतीला पूर्वी ज्यांनी मदत मागितली होती, त्याला फोन करण्यासाठी टाळटाळ करीत होती. विलंब लावत होती. इकडे मृत्यू जवळ येत आहे असे संकेत तिच्या पतीला दिसत होते. त्यामुळे पतीच्या डोळ्यात असावे येत होती आणि धाराही लागल्या होत्या. शेवटी पतीच्या डोळ्यातील धारा पाहून पत्नीने त्या व्यक्तीला फोन केला. त्यांनी फोन उचलला आणि बोलला, बोला ताई! काय काम काढले आहे आपण माझ्याकडे? त्यावेळी ती सतत रडत होती. तिच्या डोळ्यातून आसावे सतत येत होती. तेव्हा ज्यांना तिने फोन केला तो म्हणाला ताई रडू नका, जे काही असेल ते स्पष्ट सांगा. तेव्हा ती म्हणाली माझे पती शेवटची घटका मोजत आहे आणि त्यांची तुम्हाला भेटण्याची शेवटची इच्छा आहे. तो म्हणाला मी त्वरित दवाखान्यात येतो आणि निघाला व दवाखान्यात जाऊन त्याला पाहिले आणि भेटला त्याचे रडणे बंद होत नव्हते. त्यावेळी तो म्हणाला रडू नको बोला! मला माफ कर माझे चुकले तेव्हा मी तुला जे काही बरे वाईट बोललो त्याची माफी मागतो. तो व्यक्ती ठीक आहे, असे म्हणाला आणि डॉक्टरला भेटला. डॉक्टर म्हणाले याला रक्ताची गरज आहे. त्या ग्रूपचे रक्त गट असणारी भेटली नाही. त्यामुळे त्याच म्हणजे पेशंटचे जीवित राहण्याची शक्यता कमी आहे. त्याचा पण रक्त गट ओ रक्त गट होता. त्यामुळे त्यानी पेशंटला माझे रक्त द्या. मी त्याला रक्त देण्यास तयार आहे असे बोलला आणि त्वरित त्याला रक्त देण्यास सुरवात झाली. पहाता, पहाता, त्याची हालचाल सुरु झाली त्याला मानसिक समाधान पण मिळले. त्याच्यात ऊर्जा निर्माण झाली. तो पेशंट हळूहळू बरा होत होता. दोन, तीन दिवसात त्याला दवाखान्यातून सुट्टी झाली. तो घरी आला. पहिल्यांदा ज्या माणसाने रक्त दिले, त्याच्या पाया पडला आणि पुन्हा, पुन्हा माफी मागू लागला. जी वेळ असते ती सांगून येत नाही. पैसा आहे म्हणून घमेंड करू नका. चूक झाली तर मान्य करा, कोणाचेही मन दुखेल असे बोलू नका. वेळ सांगून येत नाही. म्हणून अहंकार बाळगू नका. विनाकारण कोणालाही त्रास देऊ नका, आज आपला रुबाब आहे, पैसा आहे. म्हणून कोणाचे नुकसान होईल असे वागू नका, सत्तेचा गैरवापर करू नका. भ्रष्टाचार करू नका, व्यभिचार करू नका, हिंसा करू नका, धर्मा धर्मात भांडणे होतील असे वक्तव्य करू नका. कुणाला अपंगत्व आले असेल त्यावर हसू नका, क्रोधावर नियंत्रण ठेवा. नेहमी सत्याची कास धरा, मनात दुसऱ्याप्रती करुणा आणि मैत्रीभाव मनात असू द्या. पत्नी दरवाज्यापर्यंत सतत येत राहते, समाज स्मशान पर्यंत येतो आणि पुत्र अग्नी देण्यापर्यंत असतो. केवळ त्याचे चांगले आणि वाईट कर्म हे मागे उरतात. तुम्ही लोकांचे वाईट केले असेल तर तुम्हाला लोक वाईट मेल्यावर देखील म्हणतील. तुम्ही चांगले कार्य केले असतील तर लोक चांगलेच म्हणतील हा निसर्गाचा नियम आहे. जे आपण बी शेतात पेरतो तेच उगवते. शेतीत बियाचे उगवणे हे निसर्ग निर्मित आहे. जिच्या उदरात जन्म होतो ती माता असते आणि जिच्या उदरात म्हणजे माणूस मरण पावल्यानंतर अस्त होतो ती माती असते म्हणजे धरती माता होय. त्यामुळे आईच्या त्यागाला आणि मातीच्या प्रत्येक ऋतूतील वासाला विसरू नका. तुमच्या जीवनाचा अंत कोणत्या दिवशी, कोणत्या ऋतूमध्ये होईल सांगता येत नाही. ज्याप्रमाणे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे या निसर्गात तीन ऋतू आपल्याला जाणवतात. त्या त्या ऋतूप्रमाणे आपल्याला राहावे लागते, आपल्या राहणीमानात, खाण्या पिण्यात बदल करावा लागतो. माणसाच्या जीवनात सुख आणि दुःख येतात. माणसाला गरम करणे म्हणजे उन्हाळा होय. तो आला की आपले बोलणे पहा, अरे काय सूर्य तापत आहे. आग ओकत आहे असे लोक आपण बोलतांना ऐकतो. पुढे पावसाळा येतो त्यावेळी म्हणतात अरे या पाण्याने तर नाकीनउ आणले, किती बरसतो आहे हा पाऊस, किती नुकसान करतो. शेतकऱ्याचे, शेतमजूराचे, जनावराचे, घराचे, दाराचे, कामही करू देत नाही. या पावसाने तर नाकीनऊ आले सारे असे बोलतांना दिसतील. पुढे हिवाळा येतो तेव्हा थंडी जास्त पडते. त्यावेळी देखील ही माणसे, महिला काय थंडी आहे म्हणून बोंबलताना दिसतील. माणूस, महिला कुठे समाधानी आहे. या निसर्गालाच ते दोष देण्याचा प्रयत्न करतात. दोष देतात, हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहतो. तर हा माणूस किती स्वार्थी आहे. त्याला ना उन्हाळ्यात समाधान आहे, ना पावसाळ्यात समाधान आहे, ना हिवाळ्यात समाधानी आहे. मग तो समाधानी आहे का? का नाही? कारण तो अज्ञानी आहे. अहंकारी आहे, स्वार्थी आहे, काही मध्ये जास्त मी पणा आहे. भेदभाव करणारी आहे. उच्च, नीच मानणारी आहे. भ्रष्टाचारी आहे, व्यभिचारी आहे. कोणीही कोणाचे ऐकून घेण्याच्या मानसिकतेत नाही. म्हणून समस्या आहे. जी माणसे निसर्गाला समजू शकत नसेल तर ती माणसे, माणसातील अवगुण कसे ओळखणार! म्हणून अज्ञानातून बाहेर पडल्याशिवाय खरे आणि खोटे समजणार नाही. ‘जीवनात अनपेक्षित आलेले दुःख तेव्हा’... जास्त आले की सारे कळायला लागते. तेव्हा तो अगदी मृत्युच्या जवळ असतो त्यामुळे त्याला फायदा होत नाही. वेळ निघून गेलेली असते. म्हणून माणसाने माणसासी माणसाप्रमाणे वागावे. म्हणजे स्वतंत्र, समता, बंधूभाव आणि सर्वांना समान न्याय मिळेल. असे जीवनात जगले तर सुख आणि दुःख कळेल. ■ ■



अविनाश टिपले
मो. 9970917389

# बाबा

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

जगात आईचे अनन्यसाधारण महत्त्व हे आहेच. आईच्या पायाखाली जर स्वर्ग आहे तर वडिल त्या स्वर्गाचा दरवाजा आहेत. जर दरवाजा उघडलाच नाही तर आतमध्ये प्रवेश करता येणे शक्य नाही. वडिलांना याची जाणीव असते की, एका सहृदयी लेकराला आई नऊ महिने आपल्या उदरात त्याचे पालनपोषण करते. पण त्याच्या जन्मानंतर त्या लेकराचे आईने नऊ महीने जपलेले काळीज कधीच दुःखी, कष्टी होऊ नये म्हणून वडिल आयुष्यभर काळजी करीत असतात. लेकीच्या विवाह समारंभात बापाला वाटते माझी लाडकी लेक खूप नाजूक आहे. मंगलाष्टकाच्या वेळी वऱ्हाड्यांनी अक्षदासुद्धा हळुवारपणे टाकाव्या. आज ती तिच्या आईजवळ आपल्या वडिलांबद्दल भरभरून बोलत होती. ती म्हणाली, ‘बाबा त्या पुस्तकासारखे आहेत, ज्याच्या मुखपृष्ठावरून आत असलेल्या मजकुराची कल्पना करता येत नाही. वरवर कठोर वाटणारे वडिल मनाने खूप हळवे असतात. मला अजूनही बाबांनी तुला म्हटलेले वाक्य आठवते ‘घरात लेकरांचा अन् अंगणात चिमण्यांचा चिवचिवाट असला की, घर कसे दिवसभर आनंदात न्हाऊन निघते.’ वडिलांच्या मनाची आणि समुद्राच्या पात्राची खोली जरी सारखी असली तरी त्यामध्ये एक फरक आहे. समुद्राच्या खोलीत पोहणे न येणारी व्यक्ती मरून जाते. पण वडीलांच्या मनाच्या सागरात ती तरून जाते. ती व्यक्ती कधीही बुडत नाही. जेव्हा काही भावभावना शब्दातून व्यक्त करता येऊ शकत नाहीत, तेव्हा आईला आपल्या भावना अश्रूतून व्यक्त करता येतात; पण बापाच्या नशिबी तेसुद्धा नसते. ते सर्वांसमक्ष रडूही शकत नाहीत. वडिलांच्या बिछान्याची झडती घेतली तर त्यांची उशी आसवांनी भिजलेली दिसेल. वडिल म्हणजे ती व्यक्ती, जी कुटुंबातील सदस्यांच्या उचकीचे कारण बनते; पण हुंदक्यांचे कारण न बनण्याची कायम दक्षता घेते. कारण ओढ आणि आपुलकी काय असते ते फक्त बापालाच कळते. ते प्रत्येकाला जीव लावत असतात. जेव्हा एखाद्या लेकराचा हट्ट पूर्ण होत नाही, तेव्हा ते रूसते, बाबांशी अबोला धरते, तेव्हा बाबा या एकाच कारणासाठी काय वाट्टेल ते करून त्याचा हट्ट पूर्ण करतात की, सायलेंट मोडवर फक्त मोबाईल बरा वाटतो लेकरू नव्हे. बाबा नेहमी म्हणतात ‘मी माझ्या मुलाचा हुंडा मागणार नाही. कारण हुंड्याची रक्कम स्वीकारणे वाटते तेवढे सोपे काम नाही. त्यासाठी माणसाच्या अंगी पराकोटीची निर्लज्जता, कमालीचा भिकारचोटपणा आणि रक्तात भिनलेली लालसीवृत्ती असावी लागते. त्यांच्या मते हुंडा ही प्रथा नसून भीक घेण्याची सामाजिक पद्धती आहे. त्यांचे विचार खरेच किती स्पष्ट आहेत की, आयुष्यात तुम्ही स्वतः एवढे कमवा की मुलाच्या लग्नात हुंडा मागायची वेळ येणार नाही. अन् लेकीला एवढे शिकवा की हुंडा देण्याची गरज भासणार नाही. हुंड्यात दिलेला पैसा एखादेवेळी लेकीच्या कामात पडणार नाही. पण, तिला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी केलेला खर्च लेकीला एक मजबूत भविष्य प्राप्त करून देते. ते म्हणतात कुंडलीतील छत्तीस गुण नव्हे, तर फक्त चार गुण जरी जुळले तर अवघाची संसार सुखाचा होईल. ते चार गुण म्हणजे चांगला व्यवहार, मनाची निर्मळता, स्वच्छ नियत अन् प्रामाणिकता. खरेच बापाला समजून घ्यायचे असेल तर त्यांच्या समोर नव्हे तर त्यांच्या जागी उभे राहावे लागते. संस्काराचे धडे शिकायला कोणत्याही कॉलेजमध्ये जावे लागत नाही. कारण बाप नावाच चालते फिरते विद्यापीठ सतत आपल्या सहवासात असते. आई! तू तर माझ्या कुडीतील श्वास आहेस. पण बाबा? बाबा माझ्यासाठी ते दैवत आहेत. ज्या दैवताकडे कोणताही उपवास, व्रतवैकल्ये, होमहवन, पूजापाठ न करता किंवा कोणतेही साकडे न घालता आणि नवस न करताही जे मनात असेल ते आपोआप मिळते. बाप कल्पवृक्ष, बाप चिंतामणी. बापासारखा जगात, देव नाही कुणी. ■ ■

# समाजशिल्पी उद्योजक महात्मा जोतीराव फुले

**आपणास माहीत आहे की महात्मा जोतीराव फुले हे भारतातील समाजक्रांतीचे आद्य समाजसुधारक होते. त्यांनी अनिष्ट रूढी प्रथा - परंपरांना तिलांजली देवून आधुनिक भारत घडविण्याच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या सामजिक कार्याविषयी आपण सर्व ज्ञात आहात.**

महात्मा फुले हे जाणून असावेत की हजारो वर्षापासून विकासाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या या देशातील गरीब, दलीत, शेतकरी, श्रमकरी, महिला यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासठी जे काम करावयाचे आहे त्या करीता मोठ्या प्रमाणात अर्थबळाची गरज पडेल. तो अर्थबळ उभा करू शकलो तरच आपण सामजिक सुधारणेचा अंतिम टप्पा पार पाडू शकू आणि म्हणून त्यांनी समाजसुधारणा बरोबरच उद्योग निर्मितीची पायाभरणी केली. म्हणजे महात्मा फुले केवळ महान समाजसुधारकच नव्हते, तर एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योजक होते. समाजसुधारकाबरोबर व्यापारी आणि शेतकरी म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

महात्मा फुलेंकडे असलेल्या शेतीतून जे फुले काढायचे त्या फुलांच्या व्यवसायातून वर्षाला प्रचंड उत्पन्न काढायचे. फुले आणि भाजीपाला ते बाहेर निर्यात करायचे.



या व्यतिरिक्त त्यांनी धरणे, कालवे, बोगदे, पूल, इमारती, रस्ते इत्यादींची भव्य आणि देखणी बांधकामे केली. ते पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टिंग कंपनीचे कार्यकारी संचालक होते. त्यांनी मुंबई महानगलपालिकेची मुख्य इमारत, भायखळा पूल आणि परळचे रेल्वे वर्कशॉप, मुंबईतील अनेक कापडगिरण्या, भंडारदरा जलाशय, बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांचा लक्ष्मीविलास राजवाडा, मुंबईतील टाइम्स ऑफ इंडियाची इमारत, सोलापूरची लक्ष्मी विष्णू मिल इत्यादी बांधकामे उभारण्यात जोतीरावांचा कॉन्ट्रक्टर म्हणून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग होता. त्यांच्या कंपनीने केलेला कात्रजचा बोगदा, येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा ही महत्त्वाची कामे आहेत. त्यावेळी त्यांच्याकडे दगिण्यांना सोन्याचा मुलामा चढविण्याचे कॉन्ट्रॅक्ट होते. यातून मिळवलेले पैसे जोतीरावांनी सामाजिक कामासाठी मुक्त हस्ते खर्चून टाकले. जोतीरावांनी आपली सर्व संपत्ती गोरगरीब बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी, गोरगरिबांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या उद्धारासाठी खर्च केली. महात्मा फुलेंचा समाज सुधारणेच्या कर्याबरोबर त्यांनी उद्योगक्षेत्रात केलेले भरीव कार्य समजुन नोकऱ्यासाठी वण-वण फिरणाऱ्या तरुणांनी महात्मा फुले समजुन घ्यावे. त्यातून प्रेरणा घ्यावी. प्रचंड आर्थिक सक्षम होवून सामजिक कार्यात योगदान द्यावे. महात्मा फुलेंचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु. 21000/- रू. होते. तेव्हा टाटाचे वार्षिक उत्पन्न रु. 20000/- होते. यावरूनच महात्मा जोतीराव फुलेंच्या श्रीमंतीचा अंदाज करता येतो. पण राष्ट्रपिता जोतीराव फुले यांनी संपुर्ण जीवन काळात उद्योगातून कमावलेला पैसा बहुजन समाजासाठी अर्पण केला.

ते जर स्वतःसाठी जगले असते तर आज जगातील श्रीमंत लोकांच्या यादीत पहिले असते. पण मित्रहो राष्ट्रपिता जोतीराव फुले यांची कर्तृत्वाची श्रीमंती मोजायला कोणतेच माप नाही आहे. लाखो पिढ्या जन्माला येतील आणि जातील पण महात्मा जोतीराव फुले कायमचे बहुजन समाजाच्या-भारतीयांच्या मनात राहतील...!! ■ ■



अनिल भुसारी
मो. 8999843978

# विश्वातील आद्य धर्म

**जैन हा एक प्राचीन धर्म असून कालानुक्रमे तोच विश्वातील पहिला धर्म आहे. जैन धर्माचे संस्थापक भगवान महावीर आहेत. त्या नंतर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान गौतम बुद्ध; हे विश्वातील दुसरे धर्म संस्थापक आहेत.**

महावीर जैन आणि भगवान गौतम बुद्ध हे दोघेही समकालीन; परंतु महावीरांचा जन्म सिद्धार्थ गौतमाच्या आधीचा. म्हणून भगवान महावीर हे पहिले व भगवान बुद्ध हे विश्वातील दुसरे धर्म संस्थापक आहेत. जगातील इतर सर्व धर्म त्या नंतरचे आहेत. महावीरचा जन्म इ.स. पूर्व 599 आणि सिद्धार्थ गौतमाचा जन्म इ.स. पूर्व 563 मधला. यावरून दोन्ही धर्म 2500 वर्षांपेक्षाही जास्त प्राचीन आहे.

महावीर हे 24 वे तीर्थकर; म्हणजे आज प्रचलित असलेल्या जैन धर्माच्या तीर्थकरांच्या आधी 23 तीर्थकर होऊन गेले. तसेच बुद्ध सुद्धा 28 असल्याचे उल्लेख आहेत. अडीच हजार वर्षांपुर्वी होऊन गेलेल्या भगवान महावीर व भगवान बुद्धाच्या इतिहासात बरेच प्रसंग मतभेदाचे व शंकास्पद आहेत. मग त्यांच्या ही आधी होऊन गेलेल्या तिर्थंकर व बुद्धांचा इतिहास कितपत खरा असेल; हे सांगणे कठीण. प्रचलित महावीर आणि बुद्ध यांच्या इतिहासाचे पुरावे साक्ष देत आहेत; परंतु त्यांच्या आधीचे तिर्थंकर व बुद्ध यांच्याबद्धल काहीही सांगणे कठीण. त्यांच्या इतिहासाचे सत्य व तत्थ्य बाजुला ठेऊन येथे फक्त दोन्ही धर्म संस्थापकांमधील असलेले साम्य लक्षात घ्यावे; एवढेच. सत्य असत्याचा विचार करतांना इतिहासकारांनी व कथाकारांनी लेखन करतांना कशात काय घुसडले असेल; त्याचा अंदाज घेऊन आपण काय मान्य करावे किंवा काय नाही ते वाचकांनी ठरवावे.

महावीर आणि बुद्ध हे दोन्ही धर्म संस्थापक श्रमण संस्कृतीतून तयार झाले असून त्यांच्या धर्माचे अधिष्ठान सत्य, अहिंसा, संयम आणि नीतिमत्ता हेच आहे. त्या काळातील प्रचलित विचार आणि संस्कृतीतून विकसित झालेल्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा पाया असलेले जैन आणि बौद्ध हे दोन्ही धर्म समान वाटत असले तरी त्या दोन्हीत एक मूलभूत फरक आहे. तो म्हणजे; भगवान महावीरांचा जैन धर्म ‘अहिंसा परमो धर्म’ या आदर्श तत्वावर आधारलेला आहे; तर भगवान बुद्धाचे अहिंसेचे तत्व मध्यम मार्गावर आधारलेले आहे. दोघांनीही अहिंसेला महत्व दिले; पण महावीरांची अहिंसा हाच परमोच्च धर्म. म्हणजे आपला स्वतःचा जीव गेला तरी चालेल; पण आपल्यामुळे इतर कोणत्याही जीव जंतुची हत्या होऊ नये. परंतु भगवान बुद्धाचा बौद्ध धर्म दुःखमुक्तीचा व मानवी कल्याणाचा ‘मध्यम मार्ग’ आहे. निसर्गातील प्रत्येक सजीवाचे जगणे दुसऱ्या सजीवावर अवलंबून आहे. हाच निसर्गाचा नियम आहे. त्यात कोणीही कोणताही बदल करू शकत नाही; हालचाल करणाऱ्या प्राण्यांना मारून खाणाऱ्या प्राण्यांना मांसाहारी म्हटले जाते. परंतु शाकाहारी प्राणी जे खातात; त्यात सुद्धा जीव असतोच. पाने, फुले, फळे, कंद, मुळे यांच्यात सुद्धा जीव असतोच. म्हणून भगवान महाविरांच्या तत्वज्ञानातील परमोच्च अहिंसा पाळणे अशक्य ठरते. त्यांचे ते तत्व आत्यंतिक आदर्शाचा नमुना आहे; यात शंका नाही. पण प्रत्यक्ष जीवनात ते व्यवहार्य ठरत नाही. त्यांच्या अहिंसेचे काटेकोर व तंतोतंत पालन करण्यासाठी काहीही न खाण्याचा निर्णय घेतला तर तो देखील आत्मघातकी ठरतो.



आमरण उपवास करून अहिंसा पाळतो म्हटले तरी त्यातही एक प्रकारची हत्याच आहे. मग आत्महत्या सुद्धा हिंसा ठरणार की नाही? म्हणूनच भगवान बुद्धाचा सम्यक मध्यम मार्ग मानवी जीवनाचा सर्वोत्तम मार्ग ठरतो. त्यामुळेच बुद्धाचा बौद्ध धर्म लोकप्रिय ठरला व तो जगात स्वीकारला गेला आणि महाविरांचा आत्यंतिक आदर्शवादी अहिंसेचा जैन धर्म मर्यादित राहिला. यावरून कोणताही चांगला विचार सुद्धा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच चांगला असतो; असे म्हणता येईल. ■ ■



प्रा. डॉ. भीमराव गोटे
9822235029

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी न्यायालयांचा ठाम निर्णय

सर्वोच्च न्यायालय आणि मद्रास उच्च न्यायालयाचे अनुक्रमे दोन प्रकरणांमध्ये अलिकडचे निर्णय कौतुकास्पद आहेत, ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी कविता आणि विनोद-व्यंग्यांद्वारे अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे संरक्षण करण्यात आले. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वतःची लक्ष्मण रेखा ठरवतो आणि परिस्थितीनुसार त्या बदलत राहतो. तथापि, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओका आणि उज्ज्वल भुयान यांनी त्यांची भूमिका ठेवली. प्रतापगढी प्रकरणावर भाष्य करताना ते म्हणाले, आपण आपल्या प्रजासत्ताकाच्या 75 व्या वर्षात आहोत, आपण असे असू शकत नाही जिथे आपली मूलभूत तत्त्वे केवळ कविता किंवा स्टँड-अप कॉमेडीसारख्या कला किंवा मनोरंजनाच्या कोणत्याही प्रकारावर डगमगतात आणि सादरकर्त्यावर वेगवेगळ्या समुदायांमध्ये शत्रुत्व किंवा द्वेष निर्माण करण्याचा आरोप करू लागतात. असा दृष्टिकोन स्वीकारणे म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील सर्व वैध विचारांच्या अभिव्यक्तीला अडथळा आणणे असेल, जे मुक्त समाजाच्या अस्तित्वासाठी मूलभूतपणे आवश्यक आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाने स्वीडिश नागरिक, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि मोदी टीकाकार अशोक स्वेन यांचे ओसीआय कार्ड रद्द करण्याचा केंद्राचा आदेशही रद्दबातल ठरवला - त्यांना त्यांच्या आजारी आईला भेटण्यासाठी भारतात यायचे आहे परंतु ते येऊ शकत नाहीत. न्यायालयाने केंद्राला स्वेनला नवीन कारणे दाखवा नोटीस बजावण्याची परवानगी दिल्याने पुढे काय होईल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही आणि मद्रास उच्च न्यायालयानेही कामराने मागितलेला अटकपूर्व जामीन मंजूर करून त्यांची उन्मुक्ती दिली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे थेट नाव न घेता ‘गद्दार’ असे शब्द वापरून कामरा यांनी मुंबईतील एका एफआयआर दाखल केल्याच्या पार्श्वभूमीवर जामीन अर्ज दाखल करण्यात आला होता. कामराने त्याच्या ‘दृढतेबद्दल’ माफी मागून त्याचा जीव वाचवला असे नाही. रणवीर इलाहाबादिया आणि समय रैना यांच्या विपरीत, ज्यांच्या पालकांवरील स्वैर विनोदांमुळे देशवासीयांना पुन्हा एकदा ‘क्या यार’ची कडू चव आली होती. कामरा म्हणाला, ‘मला या गर्दीची भीती वाटत नाही आणि मी बेडखाली लपून ही गर्दी पांगण्याची वाट पाहणार नाही’. अभिव्यक्ती स्वातंत्र्य त्याच्या गुदमरणाऱ्या मर्यादांमधून बाहेर पडेल अशी भीती आहे का? प्रजासत्ताकाच्या हृदयात काही बदल घडत आहे का, ज्याचे प्रतीक प्रतापगढी आणि कामरा आहेत, दोघेही संविधानाच्या लाल आणि काळ्या प्रती एकसारख्याच हातात घेऊन राष्ट्राला आठवण करून देत आहेत की कलम 19 आणि 21 आपल्याला सक्षम बनवत आहेत, म्हणून त्यांनी तुम्हालाही सक्षम बनवावे का? प्रश्न असा आहे की, खरे म्हणजे कामरा सध्या तामिळनाडूमध्ये राहत असल्याने, तो सध्या तरी सुरक्षित आहे. एमके स्टॅलिन यांचे द्रमुक सरकार त्यांचे संरक्षण करेल, जरी ते न्यायालयाविरुद्धही जाऊ इच्छित नसले तरी, दरम्यान ते भाजपसमोर राजकीय आव्हान उभे करत राहील. अशाप्रकारे संसदेतही गदारोळ झाला, 14 व्या शतकातील राजपूत राजा राणा सांगा यांच्या विश्वासार्हतेवरून वाद निर्माण झाला. समाजवादी पक्षाच्या खासदाराने बाबरला इब्राहिम लोदीचा पराभव करण्यासाठी देशात आमंत्रित केल्याबद्दल त्याला ‘देशद्रोही’ म्हटले. अवघ्या 10 दिवसांपूर्वी, महाराष्ट्र विधानसभेचे कामकाज औरंगजेबाच्या राजवटीवरून सुरू असताना, नागपूर हिंसाचारात मोठ्या प्रमाणात मालमत्तेचे नुकसान झाले आणि अनेकजण जखमी झाले. कारण काही शतकांपूर्वी मृत्यूमुखी पडलेल्या मुघल सम्राटाविरुद्ध राग व्यक्त करण्याच्या अधिकाराच्या मुद्यावरून लोकांमध्ये संघर्ष झाला. या परिस्थितीत, भारताचा सध्याचा शहरी बेरोजगारी दर (17 टक्के) भूक आणि कुपोषणाच्या बाबतीत 127 देशांमध्ये 105 व्या क्रमांकावर आहे (जागतिक भूक निर्देशांक) आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबतीत आपण 180 देशांमध्ये 159 व्या क्रमांकावर आहोत (जागतिक प्रेस स्वातंत्र्य निर्देशांक) या आकडेवारीची कोणाला काहीच पर्वा आहे का? हा एक मोठा प्रश्न निर्माण होत आहे. कामराच्या ताज्या घटनेमुळे भारतात काही बदल होईल का, याबद्दल स्वाभाविकच जनमत अद्याप स्पष्ट नाही. पण कुणाला भूतकाळातील मुनावर फारुकी प्रकरण आठवते का, जेव्हा त्यांना 1 जानेवारी 2021 रोजी एका कथित विनोदासाठी अटक करण्यात आली होती जो त्यांनी सांगितलाही नव्हता, फक्त एका विशिष्ट समुदायाच्या गटाने सह-अभिनेता नलिन यादव यांना रिहर्सल दरम्यान असेच काहीतरी बोलताना ऐकले होते. या आरोपावरून; त्याचप्रमाणे, किकू शारदाचे प्रकरण आठवते, जेव्हा त्याला 2016 मध्ये डेरा सच्चा सौदा प्रमुख किंवा वीर दास यांचे अनुकरण केल्याबद्दल अटक करण्यात आली होती, ज्यांना 2021 मध्ये दिल्लीच्या सीमेवर धरणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूने आणि बलात्काराविरुद्ध आवाज उठवल्याबद्दल अटक करण्यात आली होती. कदाचित कविता आणि विनोदाचे समर्थन केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे कौतुक करायला हवे. शेवटी, व्यंगचित्र लोकप्रिय आहे. कारण ते शक्तिशाली आणि प्रसिद्ध लोकांचीही थट्टा करते आणि ते देव नाहीत तर सामान्य मातीचे बनलेले आहेत हे दाखवते. ■ ■



विकास परसराम मेश्राम
मो. 7875592800

# गिरीलिंग डोंगराच्या लेण्या

## उंदरोबा, तिघई, गौसिद्ध आणि गिरलिंग लेण्यांचा ऐतिहासिक वारसा

**सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ तालुक्यातील गिरीलिंग डोंगर हा केवळ नैसर्गिक सौंदर्याने नटलेला नाही, तर तो प्राचीन बौद्ध लेण्यांच्या ऐतिहासिक वारशानेही समृद्ध आहे. या डोंगरावर उंदरोबा, तिघई, गौसिद्ध आणि गिरलिंग अशा चार महत्त्वाच्या लेण्या आहेत, ज्या बौद्ध धर्माच्या हीनयान पंथाशी संबंधित आहेत.**

या लेण्यांचा इतिहास पहिल्या ते तिसऱ्या शतकापर्यंत जातो आणि त्या धार्मिक, ऐतिहासिक आणि पुरातत्वीय दृष्ट्याही महत्त्वाच्या आहेत.

**उंदरोबा लेणी** या कुकटोळी गावाजवळ वसलेल्या आहेत. या लेण्यांशी एक रोचक आख्यायिका जोडली गेली आहे. पूर्वी गावांमध्ये उंदरांचा उपद्रव वाढल्यास, गावकरी या लेण्यांतील माती घरात नेऊन ठेवत असत. असे मानले जात होते की या मातीमुळे उंदीर घरातून निघून जातात. या समजुतीमुळेच या लेण्यांना ‘उंदरोबा लेणी’ असे नाव पडले. येथे दोन लेण्या आहेत - एक चैत्यगृह आणि दुसरी विहार. चैत्यगृहात एक स्तूप आहे, तर विहार हे बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी वापरले जात असे.



**तिघई लेणी** या बौद्ध भिक्षूंनी विहार म्हणून वापरलेल्या असाव्यात. या लेण्यांची रचना साधी असून, त्यात तीन-तीन स्तंभ आहेत. लेण्यांच्या मध्यभागी एक खोली आहे, जिथे कदाचित बुद्ध मूर्ती किंवा धार्मिक चिन्हे ठेवली असावीत. या लेण्यांचा संबंध बौद्ध धर्माच्या हीनयान पंथाशी असल्याचे अनुमान आहे.

**गौसिद्ध लेणी** जुना पन्हाळा किल्ल्याच्या जवळ असून, या ठिकाणी पोहोचण्यासाठी दोन मुख्य मार्ग उपलब्ध आहेत. स्थानिक श्रद्धेनुसार, गौसिद्ध नावाचे एक महान तपस्वी येथे साधना करत असत, त्यामुळे या लेणींना ‘गौसिद्ध लेणी’ असे नाव पडले. येथे एकूण आठ अपूर्ण लेणी आहेत, ज्यात शिवमंदिर बांधले गेले आहे.

**गिरलिंग लेणी** ही जुना पन्हाळा किल्ल्याच्या परिसरात वसलेली एक महत्त्वाची प्राचीन गुहा आहे. या लेणींना धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व असून, येथे प्राचीन काळी साधू-संत तपस्या करत असत, असे मानले जाते. या लेण्यांमध्ये काही भाग भग्नावस्थेत असले तरी, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व मोठे आहे. गिरलिंग देवस्थान हे येथील महत्त्वाचे धार्मिक स्थळ असून, या लेण्यांमध्ये शिवमंदिर बांधले गेले आहे. दुर्दैवाने, या लेण्या आज दुर्लक्षित आहेत. वेळोवेळी झालेल्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित हस्तक्षेपामुळे या लेण्यांची पतझड झाली आहे. या लेण्यांच्या संरक्षणासाठी पुरातत्व खात्याकडून लक्ष देण्याची गरज आहे. ‘प्रत्येक लेणी ही उजेडात आली पाहिजे’ या उद्देशाने, एकजूट लेणी अभ्यास प्रचार समूह महाराष्ट्र राज्यभर दौरा करीत आहे. या समूहाने कवठेमहांकाळ तालुक्यातील गिरीलिंग डोंगरावरील अपरिचित लेण्या परिचित करून देण्यासाठी मोहीम आयोजित केली होती. या समूहाच्या माध्यमातून अनेक सदस्यांनी लेण्यांच्या अभ्यास, संवर्धन आणि प्रचारासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या समूहाच्या कार्यात खालील सदस्यांचा सहभाग होता. दादूस डोळस, प्रफुल्ल पुरळकर, संदीप पाटील, बबन ओव्हाळ, ॲड. खंडेश बगाटे, सुरेश माने, अरविंद सावंत, विनोद गवई, जयंती पिलाने, राकेश पवार, गौतम कांबळे, विकी क्षीरसागर, तुषार कांबळे, गायकवाड, रवी नरवडे, नितेश जाधव, अमोल साळ्वे, प्रदीप अढागळे, मिहीर, शिवकरण, शैलेश पवार. या सर्व सदस्यांनी लेण्यांच्या संशोधनातून त्यांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पुरातत्वीय महत्त्वाचा अभ्यास करून, त्यांच्या संवर्धनासाठी जनजागृती निर्माण केली आहे. समूहाच्या मोहिमेद्वारे अनेक अपरिचित लेण्या परिचित करून देण्यात आल्या आहेत. गिरीलिंग डोंगरावरील या लेण्या महाराष्ट्राच्या समृद्ध इतिहासाची साक्ष देत आहेत. या लेण्यांचे संरक्षण करणे आणि त्यांचा अभ्यास करणे हे आपले कर्तव्य आहे. या लेण्यांना पुरातत्व खात्याकडून लक्ष मिळावे आणि त्यांचे संवर्धन व्हावे, यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजेत. ‘इतिहास जपणे म्हणजे आपल्या मुळांना जपणे!’ ■ ■

लेखक : संदीप पाटील

